# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा भायंदर वसई विरार**
**पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**प्रेसनोट -  ,** दिनांक २६/१०/२०२१,

## सुर्यास्त ते सुर्योदयादरम्यान संशयास्पद स्थितीत मिळुन आलेल्या ३ इसमांकडे एक घातक अग्नीशस्त्र, ४ जिवंत काडतुसे व घरफोडी करण्यासाठीच्या साहित्यासह जेरबंद करण्यास विरार पोलीस ठाणेस यश

विरार पोलीस ठाणे हद्दीत वाढती चोरी, घरफोडी व जबरी चोरीच्या गुन्हयांना आळा घालण्यासाठी गुन्हे प्रकटीकरण पथक व रात्रपाळी कर्तव्यावरील पोलीस अधिकारी व अंमलदारांना पोलीस ठाणे हद्दीत सतर्क गस्त करणे, अे.टी.एम. सेंटर्स व इतर महत्वाच्या ठिकाणी वारंवार भेटी देवुन गुन्हे प्रतिबंधक गस्त करण्यास सुचित केले आहे.

दिनांक २५/१०/२०२१ ते दिनांक २६/१०/२०२१ रोजी विरार पोलीस ठाणे हद्दीत गुन्हे प्रतिबंधक गस्त करीत असताना विरार पश्चिम बीट चौकी येथे नेमणुकीस असलेल्या पो.ह. २५०/विष्णु वाघ, पो.ना.१३२०/ संग्राम कोकरे व बीट मार्शल पो.शि. २२७५/दत्ता जाधव असे विरार पश्चिम बीट हद्दीत गुन्हे प्रतिबंधक गस्त करीत होते. रात्रौ ०२.०० वा चे सुमारास डोंगरपाडा विरार(प) या ठिकाणी बसथांब्याचे मागे तीन इसम हे आपले अस्तीत्व लपवुन उभे असल्याचे मिळुन आले. सदर इसमाचे जवळ जावुन त्यांना त्याचे नाव विचारले असता त्यांच्या संशयास्पद हालचाली वाढु लागल्या म्हणुन रात्र गस्त अधिकारी पोलीस उपनिरीक्षक संदेश राणे यांना कळविले. त्यावेळी लागलीच पोउनि राणे व पथक दोन पंचाना घेवुन घटनास्थळी आले व नमुद तीनही इसमांना त्यांचे नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव अनुक्रमे १) शिवमकुमार संजयकुमार तिवारी वय २० वर्षे रा. वाकीपाडा नायगाव पुर्व ता.वसई जि.पालघर ( मुळ रा. गाव मसरग पोस्ट तालुका पानापुर जिल्हा छापरा राज्य बिहार) २) जितेंद्रकुमार हृदयनारायण सिंग वय २१ वर्षे रा. वाकीपाडा नायगाव पुर्व ता.वसई जि.पालघर (मुळ रा. मु.पो देहरी ता.राजपुर जि बक्सार राज्य बिहार) ३) अलोककुमार मुन्ना सिंग वय २३ वर्षे रा. वाकीपाडा नायगाव पुर्व ता.वसई जि.पालघर ( मुळ रा. गाव सातपुर पो. खोदाईबाग ता.गरख्रा जि.छापरा राज्य बिहार) असे सांगितले. सदर इसमांची अंगझडती घेतली असता त्यांच्याकडे खालील वस्तु मिळुन आल्या.

१) १५ से.मी लांब लोंखडी गोल नळीचा व १० से.मी लांब लाकडी मुठीचा एक गावठी कट्टा व ८ एम.एम. चे ४ जिवंत काडतुसे
२) ३ टॉर्च
३) एक काळ्या पिवळ्या रंगाचे एक्सा ब्लेड,
४) ३ लहान मोठया आकाराचे लोंखडी स्क्रु ड्रायव्हर व अॅडजेस्टबल ५ स्क्रु
५) अंदाजे २४ से.मी लांबीची एक लोंखडी हातोडी,
६) एक ग्लास कटर,
७) एक पक्कड
८) दोन मोबाईल.

नमुद इसमांना वरील वस्तु ताब्यात बाळगण्याचे कारण विचारले असता त्यांनी उडवाउडवीची व असमाधानकारक उत्तरे दिल्याने त्यांचेकडील वस्तु पंचनाम्यातंर्गत जप्त करुन नमुद इसम चोरी करण्याचे उद्देशाने सुर्यास्त ते सुर्योदयादरम्यान आपले अस्तीत्व लपवुन कोणताही परवाना नसताना गावठी कट्टा हे अग्नीशस्त्र, ४ जीवंत काडतुसे व इतर घरफोडीचे सहित्यासह मिळुन आले म्हणुन त्यांचेविरुध्द विरार पो.ठाणे गु.र.क्र. १०२०/२०२१ कलम ३,२५ शस्त्र अधिनियम १९५९ सह कलम १२२ (अ), १२२ (ई) महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ प्रमाणे गुन्हा नोंद करुन आरोपींना अटक करण्यात आले आहे. नमुद गुन्हयाचा पुढील तपास विरार पोलीस ठाणेकडुन चालु असुन आरोपींनी गुन्हयातील हस्तगत अग्नीशस्त्र कोठुन आणले व त्यांनी आतापर्यंत केलेले गुन्हे याबाबत तपास चालु आहे.

सदरची चांगली कामगिरी मा. पोलीस उप आयुक्त, परि.३ श्री. प्रशांत वाघुंडे, मा. सहा. पोलीस आयुक्त, विरार विभाग श्री. रामचंद्र देशमुख व वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सुरेश वराडे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उ.नि. संदेश राणे, पो.ह. २५०/विष्णु वाघ, पो.ना.१३२०/संग्राम कोकरे, बीट मार्शल पो.शि. २२७५/दत्ता जाधव व पो.शि. ७१७/सागर घुगरकर यांनी केली आहे.